# बाबांचे संकेत

१ ऑक्टोबर, २०२०

आत्मीय वाचकांनो,

दरवर्षी, ऑक्टोबरच्या संपूर्ण महिन्यादरम्यान बाबांच्या महासमाधीचा महोत्सव साजरा करत असताना, श्रीगुरुमाई आपल्याला बाबांच्या संकेतांप्रति जागरूक होण्यासाठी प्रेरित करतात, महासमाधी हा तो समय आहे, जेव्हा बाबांनी इहलोक सोडला आणि ते दिव्य परमात्म्यात पूर्णपणे विलीन झाले. काय असू शकतो, बाबांचा संकेत? अल्पशा दृढनिश्चयासह आणि केंद्रणासह पाहिल्यास आपण हे अनुभवू शकतो की, हे जग बाबांच्या संकेतांनी *ओसंडून वाहते* आहे! बाबांची कृपा इतक्या असंख्य प्रकारांनी प्रकट होऊ शकते, की आपण एकदा जर का या सुसंधीचा सदुपयोग करण्याकडे आपले लक्ष वळवले, तर आपण संपूर्ण दिवसभर बाबांचे संकेत पाहू शकतो. अशा रीतीने, आपण त्यांच्याप्रति जागरूक होतो, जे स्वतः अनंततेशी, परमेश्वराशी एकरूप झाले आहेत आणि जे त्यांच्या उपस्थितीची आणि प्रेमाची स्पष्ट जाणीव आपल्याला आपल्या जीवनात करून देतात. या दिव्य विरोधाभासाविषयीची माझी समज आणि याचा अनुभव सखोल बनवण्यासाठी मी ही कविता लिहिली आहे :

आता वेग थोडा कमी करू या, आणि
जागा करू या, त्या प्रकाशासाठी
हृदयासाठी, या सर्वांमध्ये स्पंदित होणाऱ्या
त्या प्रशांततेसाठी.

तो ज्याची आपण पूजा करतो, आपल्या अंतरी आहे.
तो ज्याची आपण पूजा करतो, आपल्या बाहेर आहे.
तर मग आपण कुठे का जावे?

बाबांच्या संकेतांप्रति जागरूक होण्याचे श्रीगुरुमाईंचे आमंत्रण आपल्याला एक आनंददायी आव्हान प्रदान करते : ज्या जगाला आपण दररोज पाहतो, त्याला एका नव्या दृष्टीतून पाहणे आणि ज्या कशाशी आपली गाठभेट होते, त्या सर्वांतील देदीप्यमान आत्म्याला जाणणे. कदाचित या संपूर्ण ऑक्टोबर महिन्यात, जो महिना सिद्धयोग मार्गावर बाबांचा महिना म्हणून ओळखला जातो, आपल्यासोबत एक छोटीशी वही बाळगण्याची तुमची इच्छा असू शकेल, जेणेकरून तुम्ही संपूर्ण महिनाभर अनुभवणार असलेल्या बाबांच्या त्या सर्व संकेतांविषयी लिखाण करू शकाल. मी

स्वतःदेखील असे करण्याचा विचार करतो आहे, आणि त्याबरोबरच मी त्या सुंदर व दीप्तिमान क्षणांचे फोटोदेखील घेईन, जे त्या समयी माझ्या दृष्टीस पडतील.

बाबांनी २ ऑक्टोबर, १९८२ या पौर्णिमेच्या दिवशी महासमाधी घेतली आणि म्हणून सौर पुण्यतिथी [पाश्चात्य कॅलेंडरनुसार] प्रत्येक वर्षी २ ऑक्टोबरला आणि चांद्र पुण्यतिथी [भारतीय पंचांगानुसार] पौर्णिमेच्या दिवशी साजरी केली जाते. वर्ष २०२०मध्ये, आपण चांद्रतिथीनुसार बाबांचा महासमाधी दिवस ३१ ऑक्टोबरला साजरा करणार आहोत, ज्या दिवशी केवळ पौर्णिमाच नव्हे, तर ब्लू मूनही असणार आहे—पाश्चात्य कॅलेंडरनुसार एकाच महिन्यात येणारी दुसरी पौर्णिमा. पाश्चिमात्य देशांत, *once in a blue moon [वन्स इन अ ब्लू मून]* ही एक म्हण आहे, जिचा उपयोग एखाद्या दुर्मीळ आणि त्याबरोबरच मौल्यवान गोष्टीचे वर्णन करण्यासाठी केला जातो; आणि हे शब्द निश्चितच बाबांसारख्या एका महान आत्म्याच्या जीवनाला आणि कृपेला प्रतिबिंबीत करतात.

माझ्यासाठी त्या आध्यात्मिक पुण्यफलाची कल्पना करू शकणेदेखील सर्वस्वी अशक्यप्राय आहे, जे अशा जगण्याशी जोडले गेले आहे, जसे जीवन बाबा जगत होते—किंवा जसे गुरुमाई जगत आहेत—ईश्वरसाक्षात्काराच्या अखंड अनुभूतीत जगणे आणि अशा एकमात्र उद्देशाने जगणे की, इतर लोकांनाही त्याच परमोच्च स्थितीप्रत घेऊन जाता यावे. तरीदेखील भारतीय परंपरेनुसार, जे लोक अशा महान आत्म्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी त्यांचे स्मरण आणि त्यांचा सन्मान करतात, त्या लोकांना या महान आत्म्यांच्या आध्यात्मिक पुण्यफलाचा काही अंश प्राप्त होतो. आणि म्हणून या पावन दिवशी बाबांचे स्मरण करण्यासाठी आपल्याला प्रोत्साहित केले जाते.

बाबा मुक्तानंदांच्या महासमाधीच्या या महिन्यात, बाबांचे स्मरण कसे करावे याची निवड आपल्यापैकी प्रत्येक जण करू शकतो. या वर्षी बाबांचे स्मरण तुम्ही कशा प्रकारे करू इच्छिता? बाबांच्या महासमाधीविषयी सिद्धयोगी जे अनुभव सांगतात, ते अनुभव वाचून? गुरू-पूजेच्या अभ्यासाचे अन्वेषण करून? सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटला पाठवण्यासाठी कलेकलेने वाढणाऱ्या चंद्राचे फोटो घेऊन? ‘ओम नमो भगवते मुक्तानंदाय’च्या अनेक रागांपैकी कोणत्याही एका रागात बाबांच्या नामाचे संकीर्तन करून?

बाबांच्या महासमाधीविषयी वेबसाइटवर वाचल्यानंतर, मी गुरुदेव सिद्धपीठात स्थित असलेल्या त्यांच्या समाधीमंदिराची मानसिक तीर्थयात्रा करण्यासाठी प्रेरित झालो. मला बाबांचे सान्निध्य अनुभवण्याची हार्दिक उत्कंठा होती; बाबा सदेह रूपात असताना मी त्यांना कधीच भेटलो नव्हतो आणि त्यांच्या सान्निध्यात राहण्याची माझी इच्छा होती. मी ध्यानाला बसलो आणि माझ्या मनःचक्षूद्वारे मी गुरुदेव सिद्धपीठाच्या मुख्य कमळद्वारातून आत प्रवेश केला. आधी मी गुरुचौकात गेलो व श्रीगुरुमाईंच्या आसनासमोर नतमस्तक झालो. मी काही मिनिटे तिथे थांबलो, माझ्या

श्रीगुरूंच्या उपस्थितीच्या प्रशांतीने व निश्चलतेने पुलकित होऊन. त्यानंतर मी समाधीमंदिरात गेलो, या अपेक्षेने की तिथे प्रवेश करताच बाबांनी जेथे चिरविश्रांती घेतली आहे त्या साध्याशा संगमरवरी पावन समाधीसमोर असलेल्या सुशोभित वेदीवर त्यांच्या पादुकांचे दर्शन मला होईल. पण, मला असे दिसले की, बाबा तर स्वतः तिथे उभे आहेत, जणू काही ते माझी वाट पाहत आहेत. त्यांनी आनंदाने आणि प्रेमाने माझ्याकडे पाहत स्मित केले आणि मग मला आलिंगन दिले. माझ्या हृदयात काहीतरी द्रवीभूत होते आहे असे मला जाणवले आणि मला माझ्या अंतरी गहन शांती आणि प्रेम उद्भवत असल्याची जाणीव मला झाली. ते सर्व विलक्षणही होते आणि अतिशय सहजही होते. मला अशी जाणीव झाली की, बाबा सदैव माझ्यासोबत होते, ते माझे संरक्षण करत होते व मला मार्गदर्शन करत होते आणि ज्या-ज्या वेळी माझे हृदय मला त्यांच्याकडे खेचून नेते, त्या-त्या वेळी मी *बाबांसमवेत असू शकतो.* हा सिद्धयोग गुरूंचा त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी कृपाप्रसादच आहे की, विद्यार्थी आपल्या हृदयात श्रीगुरूंची ही शाश्वत उपस्थिती अनुभवतात.

कृपा *काय* असते, याविषयी तुम्ही कधी विचार केला आहे का?

जगातील या असामान्य आव्हानात्मक समयी, मी कृपेविषयी बरेच चिंतन-मनन करत राहिलो आहे—कृपा काय आहे आणि ती आपल्या जीवनावर कशा प्रकारे परिणाम करते. अत्यंत अलौकिक दृष्टीने पाहता, पावन कृपाशक्ती आपल्या खऱ्या सारतत्त्वाच्या दिव्यत्वाविषयी आपल्याला जागृत करते आणि आपल्या सीमित जीवभावाचे रूपांतरण त्या प्रकाशाच्या आणि सौंदर्याच्या बोधामध्ये करते, जो आपल्या स्वतःच्या अंतरी, या जगामध्ये आणि आपल्या सभोवतालच्या लोकांमध्ये विद्यमान आहे. किती अद्‌भूत आहे हे! शक्तिपात दीक्षेद्वारे—आपल्यातील पवित्र कुंडलिनी शक्तीच्या जागृतीद्वारे—श्रीगुरू, भगवंताचा प्रकाश हाच आपला *स्वतःचा* प्रकाश आहे असा बोध वृद्धिंगत करण्याच्या आपल्या प्रवासाला सुरुवात करून देतात.

कृपा आपल्या जीवनात छोट्या-छोट्या रूपांतही प्रकट होऊ शकते, अगदी व्यक्तिगत आणि रहस्यमय पद्धतींनी—एक असा खडक दिसणे ज्याची नैसर्गिक रचनाच हृदयाच्या आकाराची आहे, अगदी योग्य वेळी एका चिरपरिचित मित्राचा चेहरा दिसणे किंवा मोरपिसाच्या आकारातील एखादा ढग दिसणे. मी यापूर्वीही ज्याचा उल्लेख केला आहे, त्यानुसार तुम्हाला कदाचित या संपूर्ण महिन्यादरम्यान बाबांचे संकेत शोधण्याचा आनंद उपभोगता येईल : निसर्गात, इतर लोकांमध्ये आणि सौंदर्यामध्ये व चमत्कारांमध्ये, असे छोटे-मोठे संकेत जे आपल्या जीवनाला व्यापून टाकतात. ही सर्व दिव्य कृपेची प्रकट रूपे आहेत.

कृपेचे एक सुंदर स्वरूप आहे ज्याकडे मी तुमचे लक्ष वेधू इच्छितो, ते म्हणजे सिद्धयोग वेबसाइटवरील 'दिव्य सूक्त' हे पृष्ठ—कृपेचे रंग, ज्यामध्ये गुरुमाई संक्षिप्त रूपात शिकवणींचे एक

संकलन प्रदान करतात, ज्यातील काही शिकवणी थोडक्या शब्दांमध्ये आहेत तर काही फक्त एक शब्द इतक्याच लांबीच्या आहेत. प्रत्येक शिकवण निसर्गाच्या सुंदर फोटोवर कलात्मकरित्या प्रस्तुत केली गेली आहे. ज्या शिकवणीने तुमचे लक्ष वेधले आहे अशी शिकवण निवडण्यासाठी तसेच पृष्ठाच्या सौंदर्याला व त्यातील प्रज्ञानाला पुन्हापुन्हा भेट देता यावी म्हणून ते पृष्ठ ब्राउझरवर दिवसभर खुले ठेवण्यासाठी मी जसा प्रेरित झालो आहे, तसेच कदाचित तुम्हीही प्रेरित व्हाल.

ऑक्टोबरचा समय हा एक सर्वोत्तम काळ आहे, श्रीगुरुमाईंच्या नववर्ष-संदेशावरील आपली चिंतने आत्मसात करण्याचा आणि देवी भगवतीची आराधना करण्याचा.

**श्रीगुरुमाईंच्या नववर्ष संदेशावर चिंतन-मनन**

सिद्धयोग अभ्यासाचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू आहे, श्रीगुरूंच्या शिकवणींचे अध्ययन करणे, त्यांच्यावर चिंतन-मनन करणे आणि त्या शिकवणींना आपल्या जीवनात कार्यान्वित करणे. ‘श्रीगुरुमाई के नववर्ष-संदेश पर चिन्तन-मनन’मध्ये सिद्धयोग विद्यार्थी ‘मधुर सरप्राइझ्’मधील एका शिकवणीवरील चिंतन-मनन करण्याचे आणि ती शिकवण कार्यान्वित करण्याविषयीचे आपले अनुभव सांगतात. वर्ष २०२०मध्ये, ही चिंतन-मनने सप्टेंबर महिन्यातच वेबसाइटवर येऊ लागली आहेत. प्रत्येक चिंतन-मनन हे एक रत्न आहे; प्रत्येक चिंतन-मनन हे आपल्या स्वतःच्या साधनेत व जीवनातील परिस्थितींमध्ये लागू करण्यासाठी एक प्रेरणा आहे. ऑक्टोबर महिन्यात आणखीही चिंतन-मनने दिली जातील.

**नवरात्री व दसरा : १७ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर [भारतात १७ ते २५] आणि २५ ऑक्टोबर**

नवरात्री, महादेवीच्या आणि जगज्जननीच्या, देवी भगवतीच्या सन्मानार्थ साजरा केला जाणारा एक परंपरागत भारतीय उत्सव आहे. देवी भगवती, पराशक्तीच्या तिच्या सारस्वरूपात, जगाच्या संरक्षणासाठी व त्याच्या उद्धारासाठी अनेकानेक रूपांमध्ये प्रकट होते.

वर्ष २०२०मध्ये भारतात, नवरात्रीचा महोत्सव १७ ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबर यादरम्यान साजरा केला जाईल. सिद्धयोग मार्गावर, प्रथेनुसार देवीच्या तीन स्वरूपांची अनुक्रमे तीन-तीन रात्री पूजाअर्चा केली जाते : सर्वप्रथम महादुर्गा, त्यानंतर महालक्ष्मी आणि शेवटी महासरस्वती. पाश्चात्य देशांमध्ये, या वर्षीचा महोत्सव १७ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर या काळात साजरा केला जाईल, ज्यामुळे ही पारंपारिक नवरात्री फक्त आठ दिवसच असेल. एखाद्या वर्षी असे यामुळे घडते, की चांद्र तिथीनुसार दोन शुभ रात्री एकाच रात्री येतात. अशा प्रकारे, या वर्षी श्री मुक्तानंद आश्रमात पहिल्या दोन रात्री देवी महादुर्गेचा सन्मान केला जाईल. या दोन रात्रींमध्ये, सर्व यथोचित पूजा संपन्न केल्या जातील.

भारतात तसेच पाश्चात्य देशांमध्ये, २५ ऑक्टोबर रोजी ‘दसरा’ आहे, ज्याला विजयादशमी असेही म्हणतात, म्हणजेच ‘दहावा दिवस’ आणि ‘विजयाचा दिवस.’ भारतात हा दिवस वर्षातील साडेतीन शुभ मुहुर्तांपैकी एक दिवस म्हणून साजरा केला जातो. पवित्र शास्त्रग्रंथांमध्ये सांगितले आहे की, याच महान दिवशी—यद्यपि तो भिन्न-भिन्न वर्षांमध्ये असेल आणि अगदी भिन्न युगांमध्येदेखील — जेव्हा देवीने महिषासुराचा पराभव केला [देवी माहात्म्य], प्रभू रामचद्रांनी दशानन रावणाचा वध केला [रामायण] आणि पांडव राजपुत्र हे बारा वर्षांच्या वनवासानंतर व एक वर्षाच्या अज्ञातवासानंतर स्वगृही परतले [महाभारत]. म्हणूनच, दसरा हा उत्सव प्रकाशाने अंधकारावर मिळवलेल्या अनेक रूपातील विजयाचे प्रतीक आहे.

**स्वाध्याय अध्ययन-सत्रे**

तुम्हाला कदाचित हे माहीत असेल, की साप्ताहिक रूपात शनिवारी सिद्धयोग वैश्विक हॉलमध्ये थेट प्रसारणाद्वारे स्वाध्याय अध्ययन-सत्रे होत आहेत. ‘स्वाध्याय’ या संस्कृत शब्दाचा शब्दशः अर्थ आहे ‘आत्म-अध्ययन’ म्हणजेच स्वयं आपले अध्ययन आणि—जसे की या अध्ययन-सत्रांचे मॅनेजिंग डायरेक्टर स्वामी अखंडानंद यांनी ‘स्वाध्याय काय आहे?’ या त्यांच्या प्रस्तावनेमध्ये सांगितले होते—तसे हे ‘आत्म्याचे अध्ययन’देखील आहे. स्वाध्यायचा अर्थ आहे, आदिकालापासून पूजनीय असणाऱ्या पवित्र स्तोत्रपाठांचा अभ्यास करणे. श्रीगुरुगीतेचे पठण कसे करावे याविषयीचे विशिष्ट दिशानिर्देश आपल्याला या अध्ययन-सत्रांमध्ये मिळत आहेत, जेणेकरून जागरूकतेने केलेला स्वाध्यायचा आपला अभ्यास, आपल्याला दिव्य आत्म्याविषयीची समज व अनुभव यांकडे घेऊन जाण्यासाठी जास्तीत जास्त परिणामकारक ठरावा.

पहिल्या सत्रात, स्वामी अखंडानंदानी ‘स्वाध्याय’चा विस्तृत अर्थ सांगितला आणि त्या आठवड्यात केंद्रण करण्यासाठीच्या विशिष्ट विषयवस्तुचीही ओळख त्यांनी करून दिली : अध्ययनाच्या अनेक सुसंधींची तोंडओळख, ज्या सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर उपलब्ध असतात. स्वाध्याय अध्ययन-सत्र २ मध्ये स्वामीजींनी आपल्याला जमिनीवर अथवा खुर्चीवर बसून पठण करण्याच्या योग्य आसनाविषयीच्या विस्तृत सूचना दिल्या. त्यानंतर त्यांनी आपल्याला आध्यात्मिक अभ्यासासाठी आपली व्यक्तिगत अभिकथने लिहायला सांगितली. त्यांनी आपल्याला ही अभिकथने, भगवंतासमवेत ऐक्य असलेल्या त्या शाश्वत कथनांच्या अनुरूप लिहायला सांगितली, जी कथने प्राचीन भारतातील वैदिक ऋषीमुनींनी प्रदान केली आहेत. जसजसे आपण ‘बर’ महिन्यांमध्ये सखोल जात आहोत, म्हणजेच ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर या महिन्यांमध्ये प्रवेश करत आहोत—उत्तर गोलार्धात, आपल्यापैकी काही लोक या महिन्यांना ‘बररर’ महिने म्हणजेच थंडीचे महिने

समजतात—तसतसे आपण सिद्धयोग अध्ययनाच्या प्रेरणादायी आणि अभिनव समयामध्ये प्रवेश करत आहोत.

***

माझ्या मते, बाबांच्या जीवनाचा सर्वात महान वारसा ही ती एक शिकवण आहे, जी श्री मुक्तानंद आश्रमाच्या प्रवेशद्वाराच्या वर या शब्दांत अभिव्यक्त केली गेली आहे : *God Dwells Within You as You [तुमचा राम, तुमच्या अंतरी तुमच्याच स्वरूपात वास करतो.]* अलीकडेच, माझ्या पत्नीला व मला भेटायला आलेल्या एका मैत्रिणीने तिचा अनुभव सांगितला, जो तिला वीस वर्षांपूर्वी आश्रमात प्रवेश करताना आला होता. तिने सांगितले की, आश्रमाच्या प्रवेशद्वाराच्या कमानीवरील बाबांचे हे शब्द तिने जेव्हा पाहिले, तेव्हा तिच्या अंतरी आनंदाचा महापूर उमडला, एका निखालस दृढ विश्वासासह की, भगवंत खरोखरच तिच्या अंतरी तिच्याच स्वरूपात वास करतात. ही महिला न्युरोसायंटिस्ट आहे—एक अशी व्यक्ती जी मेंदूचा अभ्यास करते—आणि तिच्या स्वतःच्या डोक्यात काय चालले आहे याविषयी ती अत्यंत सतर्क राहते. ती आश्चर्यचकित झाली होती की, कशा प्रकारे बाबांच्या शिकवणीने दीर्घ काळापासून तिने धारण करून ठेवलेल्या ती पापी असण्याच्या या भावनेला दूर केले आणि ती जागा शांतीच्या आणि पूर्णतेच्या अमाप भावांनी भरून टाकली होती.

बाबांच्या आणि गुरुमाईंच्या कृपेने आणि शिकवणींनी ज्यांच्या जीवनाला अशा प्रकारेच स्पर्श केला आहे असे लोक संख्येने किती आहे याची मोजदाद करणे जरी शक्य नसले, तरी मला एका हिरव्यागार उद्यानाची कल्पना करायला आवडते, जे या ना त्या मार्गाने संपूर्ण विश्वात पसरले आहे आणि ज्याने अनेक, अनेकानेक लोकांच्या हृदयांमध्ये आणि जीवनामध्ये आपली मूळे घट्ट रुजवली आहेत. मी याकडे सिद्धयोग मार्गाच्या वारशाचे मुख्य तत्त्व या स्वरूपात पाहतो. या महिन्यात बाबांच्या महासमाधीचा महोत्सव साजरा करत असताना, आपल्यापैकी प्रत्येक जण आपल्या व्यक्तिगत रूपांतरणाविषयी चिंतन-मनन करू शकतो आणि त्याबरोबरच याविषयी विचार करू शकतो की, हे आपले उत्तरदायित्व आहे की आपण भविष्यात येणाऱ्या पिढ्यांच्या कल्याणासाठी सिद्धयोग मार्गाच्या वारशात योगदान करावे.

आदरपूर्वक,
पॉल हॉकवुड

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.